





दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २१४ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.१० जून २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


# राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांत सौर ऊर्जे चा वापर : डिसेंबर २०२५ पर्यंत अंमलबजावणी

## महाऊर्जाच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन

**पुणे (वृत्तसंस्था)**–राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात डिसेंबर २०२५ पर्यंत सौर ऊर्जेचा वापर सुरू करणार असून प्रधानमंत्री सूर्य घर योजना राज्यात प्रभावीपणे राबविणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.महाऊर्जाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला विधान परिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे , खासदार मेधा कुलकर्णी, खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे , आमदार भीमराव तापकीर, महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, महाऊर्जाच्या महासंचालक डॉ.कादंबरी बलकवडे, महाराष्ट्र राज्य वीज कंपनीचे संचालक विश्वास पाठक, ऊर्जा दक्षता ब्युरोचे सचिव मिलिंद देवरे, अतिरिक्त महासंचालक डॉ. त्रिगुण कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाऊर्जासाठी येत्या काळात दोन उद्दीष्टे महत्वाची आहेत. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जेचा वापर करण्याला गती द्यावी लागेल. प्रधानमंत्री सुर्यघर योजना यशस्वी योजना असून त्या योजनेशी संलग्न असलेली राज्याची योजना सुरू करून पहिल्या टप्प्यात १०० युनिटपर्यंतचे सर्व ग्राहक आणि दुसऱ्या टप्प्यात ३०० युनिटपर्यंतचे सर्व ग्राहक सौर ऊर्जेवर आणायचे आहेत. ३०० युनिटपर्यंत वीजेचा वापर करणाऱ्या ग्राहकांचे वीजचे देयक शून्यावर यावे असा प्रयत्न आहे.मुख्यमंत्री पुढे म्हणाले, हरित इमारतीसाठी असलेली सर्व मानके पूर्ण करणारी, निसर्गाचा पूर्णपणे उपयोग करणारी, ऊर्जेची बचत करणारी आणि आवश्यक असणारी ऊर्जा १०० टक्के निर्माण करणारी, महाऊर्जाची ही नवी इमारत हरित इमारतीचा उत्तम नमुना आहे. ऊर्जा बचतीच्या क्षेत्रात आणि अपारंपरिक ऊर्जेच्या क्षेत्रात, महाराष्ट्राने चांगली कामगिरी केली आहे. गेल्या २ वर्षात देशभरात ४ लाख कृषी पंप बसाविण्यात आले असतांना राज्याने अपारंपरिक ऊर्जेच्या वापरला प्रोत्साहन देत ५ लाख सौर कृषीपंप बसविले. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीच्या माध्यमातून १६ हजार मेगा वॉट क्षमतेचे फिडर २०२६ पर्यंत सौर ऊर्जेवर परिवर्तीत करण्यात येणार आहेत. त्याचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. विभाजीत पद्धतीने असलेला, आशियातील हा सर्वात मोठा प्रकल्प आहे. एकूणच सौर, पवन आणि हायड्रोजन क्षेत्रातही राज्याने भरारी घेतली असल्याचे फडणवीस म्हणाले.महाऊर्जाने गेल्या काही वर्षात अपारंपरिक ऊर्जा निर्माण करण्यात चांगली कामगिरी केली आहे. सौर ऊर्जेच्या निर्मितीत देशात आपण अग्रेसर आहोत. विभाजीत पद्धतीने सौर ऊर्जेवर वीज निर्माण करूनही देशात आपण महत्वाचे स्थान मिळविले आहे.



# जनतेचा खरा आवाज ठरल्या खासदार प्रतिभा धानोरकर

## महिलांपासून शेतकरी, गरिबांपासून पोलीस यंत्रणांपर्यंत सर्वांची चिंता मांडत घेतला समतोल 'विकासदृष्टिकोन'





चंद्रपूर (आशिष घुमे): राजकारण म्हणजे केवळ सत्तेची लढाई नसून, जनतेच्या प्रश्नांसाठी लढणं हेच खरी लोकप्रतिनिधीची ओळख असते, हे खासदार प्रतिभा धानोरकर यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केलं आहे. जिल्हा नियोजन समितीच्या २०२५–२६ वार्षिक योजनेसंदर्भातील बैठकीत त्यांनी मांडलेल्या सूचनांचा आणि मागण्यांचा केंद्रबिंदू केवळ योजनांपुरता मर्यादित नव्हता, तर त्या मागण्या प्रत्येक चंद्रपूरकराच्या दैनंदिन जगण्याशी जोडलेल्या होत्या.शहरापासून गावांपर्यंत, महिलांपासून शेतकऱ्यांपर्यंत आणि आरोग्य व्यवस्थेपासून पोलीस यंत्रणेपर्यंत, सर्व क्षेत्रांतील सामाजिक, मानवी व भावनिक भान असलेला विकासाचा दृष्टिकोन त्यांनी बैठकीत सादर केला. त्यांच्या मागण्या हे केवळ आर्थिक तरतुदीचे विषय नव्हते, तर त्या प्रत्येक मागणीमागे एक वेदना, एक अनुभव आणि एक सामर्थ्यवान सामाजिक दृष्टी होती.



### शेतकऱ्यांच्या गोठवलेल्या खात्यांची उकल

गोठवलेली खाती नव्हे, तर गोठलेली आशा आम्ही मोकळी करणार – खासदार प्रतिभा धानोरकर यांची ही आग्रही मागणी खरीखुरी शेतकऱ्यांच्या वेदनेची भाषा होती. कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांची बँक खाती गोठवल्यामुळे नवीन कर्ज घेणं अशक्य झालं आहे. खरीप हंगाम सुरू होत असताना शेतकऱ्यांच्या पैशांच्या अडचणी दूर करण्यासाठी त्यांनी ही तातडीची मागणी मांडली.

९ जून २०२५ ला नियोजन भवन चंद्रपूर येथे पालकमंत्री प्रा.अशोक उईके यांचा अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली. यावेळी खासदार प्रतिभा धानोरकर ,खासदार नामदेव किरसान, विधान सभेचे गटनेते आमदार विजय वडेट्टीवार, आमदार सुधाकर अडबाले, आमदार अभिजित वंजारी, आमदार कीर्तिकुमार भांगडिया, आमदार किशोर जोरगेवार, आमदार देवराव भोंगळे, आमदार करण देवतळे, जिल्हाधिकारी विजय गौडा, पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग यांची उपस्थिती होती.

### पोलीस ठाणे आणि अंगणवाड्यांचे आधुनिकीकरण

खासदार धानोरकर यांनी पोलीस ठाण्यांचे आधुनिकीकरण, पोलीसांसाठी निवासस्थानांची गरज आणि अंगणवाड्यांसाठी सुविधा वाढवण्यावर भर देत प्रशासनाला स्पष्ट संदेश दिला की विकास म्हणजे केवळ रस्ते नव्हे, तर मानवी गरजांनाही समजून घेणं.

### 'हिरकणी कक्ष' स्त्री सन्मानाचं प्रतीक

जेव्हा एक माता पोलीस ठाण्यात येते, तेव्हा तिच्यासोबत तिचं मूलही असतं. पण त्या लहानग्याच्या गरजांची दखल प्रशासनाने घ्यायलाच हवी... हे शब्द नव्हते, तर खा.प्रतिभा धानोरकर यांच्या मागणीमागचं मर्म होतं. त्यांनी सर्व पोलीस ठाण्यांमध्ये स्तनपानासाठी स्वतंत्र, सुरक्षित हिरकणी कक्ष असावा, यासाठी निधीची मागणी करून महिला सन्मानाला नवा आयाम दिला.

### मोफत शववाहिका : मृत्यूला सन्मान, गरिबांना दिलासा

माणूस शेवटच्या प्रवासात एकटा नसावा या भावनेतून खासदार प्रतिभा धानोरकर यांनी शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत शववाहिका सेवा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. मृत व्यक्तीच्या सन्मानासोबतच गरिब कुटुंबीयांच्या दु:खावर फुंकर घालणारी ही मागणी प्रत्येक संवेदनशील मनाला स्पर्शून गेली.

# मुंब्रा स्थानकाजवळ मृत्यूचा सापळा! मध्य रेल्वेच्या जीवघेण्या प्रवासाची कडवी वास्तवता

## आठ प्रवासी लोकलखाली फेकले गेले,सहा ठार




**ठाणे । प्रतिनिधी**

मुंबईकरांच्या जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या मध्य रेल्वेने सोमवारी पुन्हा एकदा आपली बेफिकिरी सिद्ध केली. मुंब्रा स्थानकाजवळ घडलेल्या भीषण अपघातात आठ प्रवासी लोकलखाली फेकले गेले, त्यातील सहा जणांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन गंभीर जखमी आहेत. ठाणेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

ही दुर्घटना सकाळी कसारा–सीएसएमटी लोकल आणि समोरून येणाऱ्या डाऊन लोकलमधील धक्काबुकीमुळे घडली. दोन्ही गाड्या जवळून जात असताना दरवाजात उभ्या असलेल्या प्रवाशांच्या पाठीवरील बॅगा एकमेकांवर आदळल्या आणि संतुलन बिघडल्यामुळे प्रवासी खाली कोसळले. ही घटना केवळ मध्य रेल्वेच्या अकार्यक्षम व्यवस्थापनाचं लक्षण नसून, दररोजचा जीवघेणा प्रवास किती धोकादायक झाला आहे याचं दाहक उदाहरण आहे.

रेल्वेच्या जनसंपर्क अधिकारी स्वप्नील नीला यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली की, अपघाताच्या ठिकाणी रेल्वेरुळांमधील अंतर अत्यंत कमी असून प्रवासी फूटबोर्ड व दरवाजात उभे होते. यामुळे धडकून बॅगा दुसऱ्या लोकलला लागल्या आणि प्रवासी खाली पडले.


दरम्यान, या दुर्घटनेनंतर रेल्वे बोर्डाने काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. यापुढे नव्या लोकलमध्ये ऑटोमॅटिक डोअर क्लोजर सिस्टम अनिवार्य करण्यात आली असून, २३८ नव्या एसी लोकल लवकरच मुंबईत दाखल होणार आहेत. जुन्या लोकलमध्येही रेट्रो फिटमेंट तंत्राद्वारे दरवाजे बंद ठेवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेवर शोक व्यक्त करत मृतांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. त्यांनी म्हटलं की, दुर्घटना अत्यंत दुर्दैवी आहे. प्रशासन सतर्क असून जखमींवर तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत. रेल्वे विभागाने याप्रकरणी चौकशी सुरू केली आहे. मुंबईतील उपनगरी रेल्वेमार्ग लाखो चाकरमान्यांसाठी दररोजचा आधार आहे. मात्र, अशा घटना या प्रवासाच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत. रेल्वे प्रशासनाचे उपाय फक्त अपघातानंतरच का आठवतात, हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# रान डुक्कराच्या हल्ल्यात युवा पत्रकार गंभीर जखमी

**मूल । प्रतिनिधी**

मूल येथील तरुण पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते अमित राऊत हे रान डुक्कराच्या हल्ल्यात गंभीर जखमी झाले. ही घटना रविवारी रात्री (८ जून) रात्री ९ वाजता चिमढा गावाजवळ घडली. अमित त्यांचे वैयक्तिक काम पूर्ण करून मूलला परत येत असताना त्याचे दुचाकीसमोर अचानक रान डुक्कर आल्यांने, त्याचे धडकेत अमीत राऊत दुचाकीवरून खाली पडले. त्यात त्यांचे डोक्याला गंभीर जखम झाल्यांचे प्रत्यक्षदर्शीने सांगीतले.

प्रथमोपचारासाठी त्यांना मूल येथील उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. नंतर त्यांची स्थिती गंभीर असल्याने त्यांना चंद्रपूर येथील डॉ. मेहरा हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. डॉ. मेहरा यांचेकडे उपचार सुरू आहेत, परंतु अद्याप त्यांची प्रकृती धोक्याबाहेर आलेली नाही.या घटनेबाबत स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते



आणि पत्रकार मित्रांनी अमित राऊत यांच्या सुरक्षित व त्वरित बरे होण्यासाठी प्रार्थना करीत आहे. ग्रामीण भागात वन्य प्राण्यांचे हल्ले वाढत असल्याने या बाबतीत प्रशासनाने योग्य ते निराकरण केले पाहिजे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

# प्रेम, समर्पण आणि समाजसेवेचा मिलाफ

# निलेश व पुष्पा यांच्या विवाह सोहळ्याने दिला अनुकरणीय संदेश






**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आयुष्यातला सर्वात महत्त्वाचा क्षण म्हणजे विवाह. बहुतेक वेळा हा क्षण भव्य, देखण्या सोहळ्यांनी साजरा होतो. पण काही माणसं आपला आनंद इतरांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी वापरतात, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यासाठी पुढाकार घेतात. असाच एक हृदयस्पर्शी, प्रेरणादायी विवाह सोहळा चंद्रपूरमध्ये पार पडला, ज्याने उपस्थित प्रत्येकाच्या मनात आदर आणि अभिमानाची भावना निर्माण केली.दिव्यांग कल्याणासाठी आपलं संपूर्ण आयुष्य वाहून घेणारे निलेश पाझारे आणि सामाजिक जाणीव असलेल्या पुष्पा सावसाकडे यांचा विवाह हा केवळ दोन मनांचा मिलन नव्हता, तर तो संवेदनशीलतेचा, समाजसेवेचा आणि जबाबदारीचा एक पवित्र दस्तऐवज ठरला.

कोणत्याही प्रथागत थाटटमाटाला फाटा देत, नोंदणी पद्धतीने झालेल्या या विवाहानंतर नवदांपत्याने एक अद्वितीय उपक्रम हाती घेतला – दिव्यांग बांधवांना स्वयंचलित वाहन, अंधांसाठी स्मार्ट काठी, श्रवणयंत्र, कुबड्यांचे वाटप, तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयातील दिव्यांग विभागाला व्हीलचेअर भेट देण्यात आली.या सोहळ्यात एक वेगळाच भावनिक क्षण अनुभवायला मिळाला – जेव्हा उपस्थित प्रत्येकाच्या डोळ्यात नजाकतीचे अश्रू तरळले आणि टाळ्यांच्या गजरात समाजसेवक दांपत्याचा सन्मान झाला. याच प्रसंगी उपस्थितांना शासकीय योजनांची माहिती देण्याचे उपयुक्त कार्यही पार पडले. समाजसेवा अधीक्षक भास्कर झळके आणि डॉ. कविश्वरी कुंभळकर यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेसह विविध योजनांची सविस्तर माहिती दिली.

निलेश पाझारे स्वतः एक दिव्यांग असून, गेल्या अनेक वर्षांपासून 'दिव्यांग कौशल्य विकास मल्टीपर्पज सोसायटी'च्या माध्यमातून दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत आहेत. सामाजिक चळवळीतील त्यांचे योगदान हेच त्यांच्या कार्याची ओळख आहे. त्यांच्या सोबत जीवनप्रवास सुरू करणाऱ्या पुष्पा यांचेही सामाजिक भान आणि समर्पण भावी वाटचालीस निश्चितच बळकटी देणारे आहे.हा विवाह केवळ दोन व्यक्तींचा नाही, तर तो संपूर्ण समाजासाठी एक संदेश होता – खरे सौंदर्य झगमगाटात नसते, तर संवेदनशीलतेत असते. खरे वैभव खर्चात नाही, तर दिलेल्या मदतीत आणि पसरलेल्या हास्यात असते.या विवाहाने चंद्रपूरच नव्हे तर समस्त समाजमनाला साद घातली आहे – 'सुख म्हणजे देण्यात आहे'.

# वीर बिरसा मुंडा इंग्रजांविरुद्ध लढा देणारे थोर क्रांतिसुर्य–विवेक बोढे

## मा.ना.सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात वीर बिरसा मुंडा यांच्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन

**घुग्घुस । प्रतिनिधी**

येथील मा.ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात सोमवार, ९ जुन रोजी सकाळी आदिवासी जननायक, क्रांतिसूर्य, वीर बिरसा मुंडा यांच्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी वीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून भाजपाचे जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांनी अभिवादन केले.

मनोगत व्यक्त करतांना भाजपाचे जिल्हा महामंत्री विवेक बोढे म्हणाले, आदिवासी जननायक, क्रांतिसूर्य, वीर बिरसा मुंडा हे इंग्रजांविरुद्ध लढणारे थोर क्रांतिसुर्य होते. त्यांनी आदिवासिंच्या हक्कासाठी इंग्रजांविरुद्ध लढा दिला. 'उलगुलान' चे मोठे आंदोलन सुरु केले. ज्यात आदिवासिंनी इंग्रज सरकारविरोधात बंड केले. शहीद वीर बिरसा मुंडा यांच्या स्मृतीदिन ९ जुन रोजी साजरा केला जातो. या दिवशी वीर बिरसा मुंडा यांच्या हौतात्म्याची आठवण केली जाते.यावेळी भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे, डॉ. सुर्यभान वासेकर, निखिल आत्राम, मंगेश उलमाले, गौरव तुराणकर, निशा उरकुडे, प्रीती धोटे, खुशबू मेश्राम, भारती परते, स्वाती गंगाधरे, प्रिया नागभिडकर, जाई आत्राम, नेहा कुम्मरवार आदींची उपस्थिती होती.



# मालेवाडा येथे जननायक बिरसा मुंडा यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील मालेवाडा येथील जेतवन बुद्ध विहार परिसरात सोमवार, दिनांक ९ जून २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता जननायक भगवान बिरसा मुंडा यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात ग्रामस्थांसह विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.कार्यक्रमाची सुरुवात शांतारामजी शेंडे यांच्या हस्ते बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर उपस्थितांनी मौन पाळून श्रद्धांजली अर्पण केली.



याप्रसंगी मार्गदर्शन करताना योगेश मेश्राम यांनी जननायक भगवान बिरसा मुंडा यांचे क्रांती कार्य या विषयावर प्रेरणादायी भाषण केले. त्यांनी बिरसा मुंडा यांचे स्वातंत्र्यप्रेम, सामाजिक सुधारणा व इंग्रजांविरोधातील लढ्याचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी सांगितले की, बिरसा मुंडा यांनी १९०० साली ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठाव करून आदिवासी समाजाला संघटित केले आणि त्यांच्या हक्कांसाठी लढा दिला.

बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजात जागृती निर्माण करताना सामाजिक सुधारणांवर भर दिला. १८९५ मध्ये त्यांनी जंगल, जमीन व मालमत्तेच्या हक्कासाठी आंदोलन सुरू केले. इंग्रज सरकारने त्यांच्या वाढत्या प्रभावामुळे त्यांना अटक करून कारावासात ठेवले, परंतु त्यांनी पेटवलेली चळवळ आजही प्रेरणादायक ठरते.कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. सूत्रसंचालन प्रदीप मेश्राम यांनी केले, तर आभार प्रदर्शन योगेश मेश्राम यांनी मानले.

# जमिनीसाठी रक्त! धाकट्या भावानेच घेतला मोठ्या भावाचा जीव

## अशोक धोडी हत्याकांडाचा मुख्य सूत्रधार अखेर जेरबंद!

### पाच महिन्यांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या अविनाश धोडीला अटक; १४ जूनपर्यंत पोलिस कोठडी

**पालघर । प्रतिनिधी**

शिवसेना पदाधिकारी अशोक धोडी यांच्या खळबळजनक अपहरण व हत्येप्रकरणातील पाच महिन्यांपासून फरार असलेला मुख्य आरोपी आणि मृताचे सख्खा भाऊ अविनाश रमण धोडी (रा. वेवजी, ता. तलासरी) याला अखेर पालघर स्थानिक गुन्हे शाखेने रविवारी पहाटे सव्वातीनच्या सुमारास सिलवासा (सेलवास) जवळील मूर्खंद येथून अटक केली. सोमवारी न्यायालयात हजर केल्यानंतर त्यास १४ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली.या प्रकरणात आतापर्यंत ६ आरोपींना अटक करण्यात आली असून, ३ आरोपी अद्याप फरार आहेत. त्यांचा शोध वेगाने सुरू असून, लवकरच त्यांनाही अटक करण्यात येईल, असा विश्वास पालघरचे पोलीस अधीक्षक देशमुख यांनी व्यक्त केला.

१९ जानेवारी रोजी अशोक धोडी यांचे अपहरण करून त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. हत्या केल्यानंतर मृतदेह गोणीत बांधून त्यांच्या स्वतःच्या कारच्या डिकीत ठेवण्यात आला आणि ती कार गुजरातमधील



अच्छाडजवळील एका पाण्याने भरलेल्या खदाणीमध्ये बुडवण्यात आली होती. तब्बल १२ दिवसांनी पोलिसांना ही कार सडलेल्या अवस्थेत सापडली होती.या प्रकरणात सुरुवातीला पाच आरोपींना अटक झाली होती. मात्र मुख्य सूत्रधार अविनाश धोडी हा पोलिस चौकशीतून पसार झाला होता आणि गेल्या पाच महिन्यांपासून तो पोलिसांना गुंगारा देत होता. अखेर स्थानिक गुन्हे शाखेने मिळालेल्या माहितीच्या आधारे त्याला अटक करण्यात यश मिळवलं.

### हत्येचं कारण: जमिनीचा आणि दारू व्यवसायातील वाद

**प्राथमिक तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, जमिनीच्या व्यवहारांतील मतभेद तसेच दारू व्यवसायातील वाद हे भाऊबांधवांतील वैराचे कारण ठरले. यातूनच अविनाशने आपल्या मोठ्या भावाचा खून करण्याचा कट रचला होता.**

**मुख्य आरोपीच्या अटकेनंतर आता उर्वरित फरार आरोपींनाही लवकरच अटक होईल, असे पोलीस सूत्रांनी सांगितले आहे. या हत्याकांडाने पालघर जिल्ह्यात खळबळ उडवून दिली होती आणि आता मुख्य आरोपीच्या अटकेने तपासाला गती मिळाली आहे.**

# भारतीय जैन संघटनेचा प्रेरणादायी उपक्रम कोल्हारमध्ये 'स्मार्ट गर्ल' कार्यशाळा यशस्वी



**कोल्हार । प्रतिनिधी**

भारतीय जैन संघटनेतर्फे समाजोपयोगी उपक्रमांच्या मालिकेतील एक संवेदनशील आणि मार्गदर्शक उपक्रम स्मार्ट गर्ल कार्यशाळा कोल्हार येथील बेलापूर रोडवरील जैन स्थानकामध्ये ७ व ८ जून रोजी उत्साहात संपन्न झाली. किशोरवयीन मुलींमध्ये आत्मभान, आरोग्य, संवादकौशल्य आणि स्वसंरक्षण याबाबत जागृती निर्माण करणाऱ्या या दोन दिवसीय कार्यशाळेला जैन समाजातील मुलींचा मोठा प्रतिसाद मिळाला.

कार्यशाळेत स्वजाणीव, मासिक पाळी दरम्यान देखभाल, आत्मसन्मान आणि स्वसंरक्षण, पालकांशी संवाद, मैत्री व मोह, निवड आणि निर्णय अशा विविध विषयांवर चर्चासत्र आणि संवाद सत्र झाले. नाशिक येथून आलेल्या बीजेएस हेड ऑफिसच्या प्रशिक्षिका सुषमा गांधी यांनी प्रभावी सत्रांचे संचालन केले. पर्यावरण सप्ताहानिमित्त सोनाली चोरडिया यांनी घरगुती सवयींमधून पाणी, वीज व कचऱ्याचे व्यवस्थापन कसे करावे याचे सुलभ मार्ग सांगितले. उद्योजक सतीश खर्डे यांनी वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर सौरऊर्जेचा वापर वाढविण्याचे आवाहन करताना सोलर प्रोजेक्ट्स घरी व व्यवसायात राबवण्याची गरज अधोरेखित केली, ज्याला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी भारतीय जैन संघटनेचे राज्य कार्यकारिणी सदस्य मनसुख चोरडिया, सुरेश बाठीया, महेंद्र कुंकूलोळ, सुधीर चोरडिया, विभागीय सचिव आशिष राका, कोल्हार शहराध्यक्ष अभिनव कुंकूलोळ, उपाध्यक्ष ॲड. भूषण राका, योगेश मुथा, दिनेश लोढा, अलोक भटेवरा यांच्यासह अनेक पालक आणि समाजबांधव उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी विशेष परिश्रम घेतलेल्या विभागीय अध्यक्ष संजय शिंगवी यांनी,मुलींनी दाखवलेली रुची आणि पालकांचा प्रतिसाद पाहता भविष्यात अशा कार्यशाळांचे आयोजन इतर ठिकाणीही करण्यात येईल,असे माध्यमांशी बोलताना सांगितले.

# वयोवृद्धांच्या आयुष्यात समाधानाचे क्षण; 'जनकल्याण' संस्थेचा स्तुत्य उपक्रम

**मूल । प्रतिनिधी**

हमारे मुठीमे है आकाश साराया स्फूर्तिदायक गीताच्या ओळी जणू मातोश्री वृद्धाश्रमात वास्तव्य करणाऱ्या वयोवृद्धांच्या मनातील भावना व्यक्त करत होत्या. डोळ्यांतून आनंदाश्रू वाहत असतानाच, त्यांचं एकाकी आयुष्य क्षणभर तरी भरून पावल्याचं दृश्य उपस्थितांच्या मनाला चटका लावून गेलं.

मूल येथील जनकल्याण सामाजिक संस्था या सेवाभावी संस्थेच्या सदस्यांनी 'एक दिवस वृद्धाश्रमात' ही संकल्पना घेऊन चंद्रपूर येथील मातोश्री वृद्धाश्रमाला रविवारी (दि. ८ जून) सदिच्छा भेट दिली. संस्थेचे अध्यक्ष राजू गेडाम आणि सदस्यांनी आपल्या परिवारासह वृद्धाश्रमातील प्रत्येकाशी प्रेमाने संवाद साधत, त्यांचं म्हणणं शांतपणे ऐकत, संवादाच्या माध्यमातून त्यांचं मन हलकं करण्याचा प्रयत्न केला. या उपक्रमाअंतर्गत संस्थेच्या सदस्यांनी वृद्धांसोबत स्नेहभोजन घेतलं, त्यांच्या आठवणी ऐकल्या आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे त्यांचं मनोरंजन केलं. संवादातून आलेल्या अनुभवांनी वृद्धांच्या चेहऱ्यावर समाधान झळकत होतं. त्यांच्या मनातील वेदनांना वाट मोकळी करून, आनंदाचे क्षण निर्माण करण्यात संस्थेच्या प्रत्येक सदस्यांनी आपुलकीचा हात पुढे केला.

चंद्रपूर येथील मातोश्री वृद्धाश्रम हे माजी मंत्री शोभाताई फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली चालवले जाते. आजमितीस येथे ६४ वयोवृद्ध महिला व पुरुष वास्तव्य करत आहेत. अनेकजण कुटुंबाने नाकारल्यानंतर इथे येऊन एकमेकांच्या सहवासात उर्वरित आयुष्य जगण्याचा प्रयत्न करत आहेत. कार्यक्रमादरम्यान वृद्धांनीही मनातील भावना व्यक्त करत, जुने दिवस आठवत, गोड आठवणी शेअर केल्या. काही सदस्यांनी २२ वर्षांनंतर एकत्र येत विचारमंथन करत समाजहितासाठी काम करण्याचा संकल्प केला. महिला मंडळांनीही संस्थेच्या कार्यात खंबीरपणे साथ देण्याची ग्वाही दिली. या उपक्रमात रवि वाळके, बंडू अल्लीवर, अमोल वाळके, गुरुदास थेरकर, आशिष आकनुरवर, अमोल दुधे, सुहास गेडाम, शिवम गेडाम, मंगला गेडाम, स्नेहा आकनुरवर, प्रीती वाळके, शीतल मेश्राम, अर्चना अल्लीवर, दिव्या वाळके, माधुरी थेरकर, दिक्षा गेडाम, धनश्री दुधे आदी सदस्यांनी सक्रिय सहभाग घेतला. संस्थेचा हा उपक्रम समाजात सकारात्मकतेचा संदेश देणारा असून, वयोवृद्धांच्या आयुष्यात एक दिवस का होईना. समाधानाचे, आपुलकीचे आणि माणुसकीचे क्षण निर्माण करणारा ठरला.



# पुलगाव आगाराला मिळाल्या पाच नवीन एस.टी.बस आमदार राजेश बकाने यांच्या पाठपुराव्याला यश

**पुलगाव । अविनाश भोपे**

पुलगाव परिसरातील प्रवाशांना गेल्या अनेक वर्षांपासून जुनाट आणि भंगार अवस्थेतील एस.टी. बसगाड्यांमधून प्रवास करावा लागत होता. बसगाड्यांच्या तुटवड्यामुळे प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र, ही स्थिती बदलण्यासाठी देवळी विधानसभा क्षेत्राचे आमदार राजेश बकाने यांनी महाराष्ट्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून, पुलगाव एस.टी. आगाराला तब्बल पाच नवीन एस.टी. बसेस प्राप्त झाल्या आहेत. या बसगाड्यांच्या लोकार्पणाचा सोहळा नुकताच पुलगाव बसस्थानकावर मोठ्या उत्साहात पार पडला.

या प्रसंगी आमदार बकाने म्हणाले, पुलगाव बसस्थानक व आगाराच्या समस्या सोडवून प्रवाशांना सुलभ व विश्वासार्ह सेवा मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे. दहा नवीन बसगाड्यांची मागणी मी केली होती, त्यापैकी पाच आज समर्पित होत आहेत. उर्वरित बसेसही लवकरच मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.बसगाड्यांचे विधिवत पूजन करून आमदार बकाने यांनी त्या जनतेच्या सेवेस समर्पित केल्या. यावेळी एस.टी. विभागाचे अधिकारी, स्थानिक पदाधिकारी, विविध राजकीय व सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्या बसगाड्यांच्या आगमनामुळे देवळी, आर्वी, हिंगणघाट, नागपूर आणि आसपासच्या गावांमध्ये सुधारित आणि नियमित बससेवा उपलब्ध होणार असून, याचा फायदा विद्यार्थ्यांना, कामगारांना आणि सर्वसामान्य प्रवाशांना होणार आहे. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळण्याची शक्यता आहे.

या उपक्रमामुळे स्थानिक नागरिकांनी आमदार बकाने यांचे विशेष आभार मानले असून, हे खरे लोकप्रतिनिधीचे कार्य आहे, अशा प्रतिक्रिया त्यांनी दिल्या. बससेवेचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी आणखी पावले उचलण्यात येतील, असा विश्वासही आमदार बकाने यांनी व्यक्त केला.या सोहळ्यावेळी संत नगरी शेगावकडे जाणाऱ्या पहिल्या नव्या बसला आमदार बकाने यांनी हिरवा झेंडा दाखवला. कार्यक्रमाला उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल चव्हाण, अप्पर तहसीलदार स्नेहा क्षीरसागर, पोलीस निरीक्षक यशवंत सोळसे, आगारप्रमुख सूरज बोबडे, बसस्थानक प्रमुख मनोहर वाणी, कार्यशाळा अधीक्षक शुभम खडतरकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रमोद बमणोटे यांनी केले. नागरिकांच्या उपस्थितीने बसस्थानक परिसरात उत्साहाचे वातावरण होते.



## कर्मयोगी तुकारामदादा गीताचार्य यांचे सेवाकार्य प्रचारकांसाठी दीपस्तंभाप्रमाणे–माणिकदादा बेलूरकर

**वर्धा । प्रतिनिधी**

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे तत्वज्ञान व ग्रामगीता प्रसारासाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहून घेतलेले कर्मयोगी संत तुकारामदादा गीताचार्य यांची आज पुण्यतिथी विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली.दादांनी ग्रामगीतातील 'ग्राम निर्माण पंचक' म्हणजेच ग्रामसभा सक्षमीकरण, ग्रामोद्योग उभारणी, नैसर्गिक शेती, गोवंश सुधारणा व अंधश्रद्धा निर्मूलन या क्षेत्रात कार्य करून समाजात विधायक परिवर्तन घडवले. त्यांचे खादी वस्त्र प्रचार, श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या शाखांची उभारणी, व ग्रामप्रवृत्तीतून समाजप्रबोधन हे कार्य आजही प्रेरणास्थान ठरते.



या पुण्यतिथीनिमित्त श्रीगुरुदेव सेवा मंडळ, वरूड खुर्द व मुऱ्हादेवी संस्थानच्या संयुक्त विद्यमाने सामुदायिक प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले. या वेळी मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब बोंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला.अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे ज्येष्ठ प्रचारक माणिकदादा बेलूरकर म्हणाले, तुकारामदादांचे जीवन आम्हा प्रचारकांसाठी दीपस्तंभ आहे. त्यांच्या विचारांचा प्रचार करणे म्हणजेच आमच्या कार्याचा खरा श्वास आहे.कार्यक्रमात तबलावादक संकेत अंबाडकर, हार्मोनियम वादक जय मानकर, समाजसेवक मनोहर धानोरकर, जगदंबा संस्थानचे सदस्य बोंद्रे यांची उपस्थिति होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन बोंद्रे (ग्रामगीताचार्य) यांनी केले.या प्रसंगी संपूर्ण गावातून महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रवंदनेने करण्यात आला.

## युवा आदिवासी क–ठाकूर समाज मंडळाचा गुणवंतांचा सत्कार व युवकांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन कार्यक्रम

**पालघर । जितेंद्र मोरघा**

जव्हार येथे युवा आदिवासी क–ठाकूर समाज मंडळाच्या वतीने गुणवंत व्यक्तिमत्त्वांचा सत्कार तसेच युवकांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शनाचा भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. समाजातील यशस्वी, कार्यशील आणि प्रेरणादायी नेत्यांचा गौरव करण्यासाठी तसेच युवकांना योग्य दिशा देण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाला समाजबांधव, युवक, महिला, मान्यवर व वयोवृद्धांचा मोठा प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आदरणीय जानू यशू माळी होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. युवराज मोरया यांनी उपस्थितांना आधुनिक युगातील शिक्षणाचे महत्त्व, कौशल्य विकास, नेतृत्व क्षमता तसेच स्पर्धात्मक जगात यशस्वी होण्यासाठी आवश्यक गुण याबाबत प्रभावी मार्गदर्शन केले.



कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरले कोब्रा कमांडो रामदास भाऊ भोगाडे यांचे संघर्षमय जीवनप्रवासाचे कथन. त्यांच्या अनुभवातून देशभक्ती, आत्मविश्वास, जिद्द आणि चिकाटी या मूल्यांची जाणीव प्रत्येकाला झाली.

कार्यक्रमात विविध मान्यवर उपस्थित होते, ज्यांनी युवकांसाठी मोलाचे मार्गदर्शन केले. युवा मंडळाच्या अध्यक्ष संजय रानडा, सचिव कल्पेश भोगाडे, उपाध्यक्ष वसंत पढेर, खजिनदार कांतीलाल कोरडा, सहखजिनदार राजेंद्र डबाळी, मुख्य सल्लागार संदीप माळी आणि सल्लागार विलास खुताडे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उत्कृष्ट कामगिरी केली.

राम तराळ, मेजर चेतन कव्हा, राजेश भोगाडे, सुनील गोविंद, जगदीश जंगली, रविंद भोरे, सुभाष भोरे, राजाराम तराळ, संतोष कोरडा, कृष्णा घुमल यांसह इतर सदस्यांनी देखील कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रम यशस्वी करण्यात आले.

## हट्टीपाडा येथे पावसाळी क्रिकेट स्पर्धा उत्साहात संपन्न



**जितेंद्र मोरघा । पालघर**

मोखाडा तालुक्यातील हट्टीपाडा परिसरात गेल्या चार दिवसांपासून रंगलेल्या ओव्हर आर्म क्रिकेट चॅम्पियन ट्रॉफी स्पर्धेचा आज (८ जून) अंतिम सामना उत्साहात पार पडला. या अंतिम फेरीत उधळे, गोमघर, घानवळ आणि श्रीघाट या संघांनी सहभाग घेतला.

उत्कंठावर्धक सामना संपल्यानंतर उधळे संघाने पहिला क्रमांक पटकावला, तर गोमघर संघाने द्वितीय क्रमांक मिळवून संघाची सन्माननी भूमिका बजावली. स्पर्धेचे आयोजन ओमसाई मित्र मंडळाने यशस्वीपणे केले असून, या उपक्रमामुळे स्थानिक पातळीवर खेळाडू आणि क्रिकेट प्रेमींमध्ये मोठा उत्साह दिसून आला. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे शिवसेना विधानसभा संघटक प्रदीप वाघ होते. पुरस्कार वितरणानंतर ते म्हणाले, पावसाळी क्रिकेट स्पर्धा हा हट्टीपाडा व परिसरातील युवकांना एकत्र आणणारा उपक्रम आहे. यामध्ये खेळाडूंना अधिक आनंद आणि उत्साह लाभतो. ओमसाई मित्र मंडळाने यावेळी पहिल्यांदाच असा प्रयोग यशस्वी केला आहे, ज्यामुळे पुढील काळातही असे आयोजन होईल याची अपेक्षा आहे. या स्पर्धेत जवळपास ४० संघांनी भाग घेतला होता, ज्यामुळे स्थानिक क्रिकेटच्या वाढत्या पसंतीचे दर्शन होते. स्पर्धेच्या यशाबद्दल आयोजक प्रीतम लहामगे यांनी सर्व सहभागी संघांचे आणि सहाय्यकांची आभार व्यक्त केले.

## कृषी अधिकाऱ्यांचा शेतकऱ्यांच्या जीवावर उदार खेळ

# बोगस कंपन्यांना संरक्षण देत शेतकऱ्यांची फसवणूक–हर्षल ठाकरे यांचा गंभीर आरोप

**उमाकांत अहिरराव । धुळे**

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यासह इतर भागांत काही कृषी अधिकारी स्वतःच्या किंवा नातेवाईकांच्या नावाने खत, बियाणे, संजीवके आणि बायो कीटकनाशके उत्पादक कंपन्या चालवत असून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे किसान सेल जिल्हा कार्याध्यक्ष हर्षल ठाकरे यांनी केला आहे.

ही गंभीर बाब अशी की, या अधिकाऱ्यांचे आर्थिक स्वार्थ पाहून बोगस कंपन्यांना संरक्षण मिळत असून, त्यांचा शासकीय पदाचा गैरवापर होतोय. या आरोपांचे निवेदन कृषी सहसंचालक, नाशिक विभाग यांच्याकडे खरीप हंगामपूर्व नियोजन बैठकीदरम्यान साक्री तालुक्यातील शेनपूर येथे प्रत्यक्ष सादर करण्यात आले.





### प्रमुख मागण्या

**संबंधित अधिकाऱ्यांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या कंपन्यांची सखोल चौकशी करावी. बोगस उत्पादनांची विक्री त्वरित थांबवून कंपन्यांचे परवाने रद्द करावेत. दोषी अधिकाऱ्यांचे निलंबन करून त्यांच्याविरुद्ध फौजदारी कारवाई करावी.निवडक पद्धतीने पारदर्शक प्रयोगशाळा तपासणी करावी. संपूर्ण प्रकरणाची मार्फत चौकशी करण्यात यावी.**

हर्षल ठाकरे म्हणतात की, काही कृषी अधिकाऱ्यांनी स्वतःच्या कंपन्यांचे किंवा नातेवाईकांच्या नावाने कंपन्या स्थापन केल्या असून, त्या कंपन्यांची निकृष्ट दर्जाची उत्पादने जबरदस्तीने स्थानिक कृषी सेवा केंद्रांवर विक्रीस लावली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन घटले असून आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात होत आहे.

आणखी खळबळजनक बाब म्हणजे गुजरात येथून फक्त २०० मध्ये खरेदी केलेली खतं शेतकऱ्यांना १००० दराने विकली जात आहेत. हा प्रकार थेट शेतकऱ्यांच्या फसवणुकीचा आहे आणि या प्रकरणामागे कृषी अधिकाऱ्यांचे आर्थिक हितसंबंध असल्याचा गंभीर संशय व्यक्त करण्यात आला आहे.

हे निवेदन हर्षल दगाजी ठाकरे (जिल्हा कार्याध्यक्ष, किसान सेल, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट), सयाजीराव ठाकरे (प्रदेश उपाध्यक्ष, किसान सेल), चंद्रशेखर अहिरराव, पृथ्वीराज काकुस्ते व इतर शेतकरी प्रतिनिधींनी संयुक्तपणे दिले आहे.

### प्रयोगशाळा तपासणी तही पक्षपात?

**निवेदनात असेही म्हटले आहे की, काही ठराविक कंपन्यांचेच नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले जातात, ज्यांना अधिकाऱ्यांकडून आर्थिक लाभ मिळतो. इतर कंपन्यांचे निकृष्ट उत्पादने जाणूनबुजून दुर्लक्षित केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.**

### शेतकऱ्यांचे विदारक वास्तव

**हवामान बदल, कर्जबाजारीपणा आणि बाजारभावाच्या अनिश्चिततेमुळे शेतकरी आधीच त्रस्त असताना, कृषी अधिकारी जर त्यांचा गैरफायदा घेत असतील तर शासनाने तत्परतेने आणि कठोर पावले उचलली पाहिजेत, असा हर्षल ठाकरे यांनी आवाहन केले आहे.**

# प्रगतीच्या वाटेवर गोमघर;समुदाय शिक्षण केंद्रामुळे नवा अध्याय

## समुदाय शिक्षण केंद्राची संकल्पना अतिशय सुंदर–प्रदीप वाघ यांचे गौरवोद्गार

**जितेंद्र मोरघा । पालघर**

गोमघर ग्रामपंचायत हद्दीत आरोहण संस्था व ग्रामपंचायत गोमघर यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या बहुउद्देशीय समुदाय शिक्षण केंद्राचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. याप्रसंगी मोखाडा पंचायत समितीचे माजी सभापती प्रदीप वाघ यांनी समुदाय शिक्षण केंद्राच्या उपक्रमाचे कौतुक करताना ही संकल्पना अत्यंत अभिनव आणि समाजोपयोगी असल्याचे प्रतिपादन केले.

प्रदीप वाघ म्हणाले, आरोहण संस्था ही नेहमीच सर्वसामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून उपक्रम राबवते. गोमघरमधील हे केंद्र म्हणजे ग्रामीण भागातील विद्यार्थी, शेतकरी, महिला आणि तरुणांसाठी ज्ञानाचा दीपस्तंभ ठरेल.विद्यार्थ्यांना भौगोलिक व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी हे केंद्र उपयुक्त ठरेल, असेही त्यांनी नमूद केले. या केंद्राच्या माध्यमातून माती परीक्षण, पीक संरक्षण, रोगनिदान, योजनांची माहिती आणि ऑनलाईन अर्ज सादर करणे यांसारख्या अनेक सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होतील. त्यामुळे ग्रामस्थांची वेळ, पैसे आणि श्रम यांची मोठी बचत होणार असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.





कार्यक्रमात आरोहण संस्थेचे अमित नारकर यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला आणि या केंद्राच्या माध्यमातून गावाच्या सर्वांगीण विकासात भर घालण्याचे उद्दिष्ट स्पष्ट केले. ग्रामपंचायत सरपंच सुलोचना गारे यांनी समुदाय शिक्षण केंद्राची जबाबदारी ग्रामपंचायतच्या माध्यमातून घेतली जाईल, अशी ग्वाही दिली. तसेच, हे केंद्र म्हणजे केवळ शैक्षणिक नाही, तर सामाजिक परिवर्तनाचेही माध्यम ठरेल, असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भालचंद्र साळवे यांनी केले, तर आभार तमन्ना यांनी मानले. या उद्घाटन समारंभाला माजी जिल्हा परिषद सदस्य कुसुम झोले, उपसरपंच भगवान झुगरे, ग्रामसेवक रजपूत, अनंता शिंदे, राजाराम शिंदे, वाकडपाडा उपसरपंच नंदकुमार वाघ, तसेच विनोद ठोमरे, राजू दोंदे, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आरोहण संस्थेचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लाख खंडाळा शिवारात रानडुकरांचा हैदोस मका लागवडीवर पाणी, शेतकऱ्यांमध्ये संताप

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यातील लाख खंडाळा शिवारात रानडुकरांच्या वाढत्या संख्येमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. नुकत्याच झालेल्या पावसामुळे शेतकरी खरीप हंगामाची तयारी करत असतानाच, या शिवारातील मका पिकावर रानडुकरांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष आणि चिंता वाढली आहे.

दि. ७ जून रोजी झालेल्या दमदार पावसामुळे संपूर्ण तालुका चिंब झाला असून, शेतकऱ्यांनी मका लागवडीसाठी मशागत केली किंवा काहींनी पेरणीही केली. मात्र लाख खंडाळा येथील शेतकऱ्यांनी रात्रभर मेहनतीने लावलेली मका रानडुकरांनी उद्ध्वस्त केली आहे.

या शिवारात पीक नुकतेच अंकुरत असताना रानडुकरांच्या कळपाने गट क्रमांक १४६ ते १५१ या शेतजमिनींमध्ये धुडगूस घातला. रामकृष्ण मोरे (ग.क्र. १५०), ईश्वर मोरे (ग.क्र. १४९), अशोक मोरे (ग.क्र. १५०), दत्तू चव्हाण (ग.क्र. १४८), शिवाजी गायकवाड (ग.क्र. १५१), पुष्पाबाई मोरे व श्रावण मोरे (ग.क्र. १४६) या शेतकऱ्यांच्या जमिनींवर नुकतीच मका लागवड झाली होती. मात्र रानडुकरांनी संपूर्ण मका पेरणी उकरून टाकली, त्यामुळे बियाण्यांचा पुरा अपव्यय झाला.



यामुळे या शेतकऱ्यांच्या खिशाला मोठा आर्थिक फटका बसला आहे. काही शेतकऱ्यांनी बाजारातून मका बियाणे खरेदी करत कर्ज करून लागवड केली होती. आता पुन्हा बियाणे, खतं आणि मजुरीचा खर्च करत लागवड करावी लागणार आहे, अशी व्यथा शेतकरी व्यक्त करत आहेत.

शेतकऱ्यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने रानडुकरांचा बंदोबस्त करण्याची तसेच नुकसानीची योग्य भरपाई देण्याची लेखी मागणी केली आहे. मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

रानडुकरांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून, त्यांनी केवळ मका नव्हे तर अन्य पिकांनाही लक्ष्य केले आहे. त्यामुळे वन विभागाने संरक्षक उपाययोजना कराव्यात, शेताभोवती कुंपण अथवा गस्तीची व्यवस्था करावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

नैसर्गिक आपत्ती, बाजारातील अस्थिरता आणि आता वन्यप्राण्यांचे उपद्रव या त्रिसूत्री संकटाने बळीराजा गांजला असून, शासन आणि प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.






# गजानन महाराज म्हणजे साक्षात सत्वगुणांचा अवतार-प्रा.सुरेश शेवडे यांचे हृदयस्पर्शी मार्गदर्शन

## 'श्री संत गजानन गाथा अमृतकण' प्रवचनात भाविकांच्या हृदयात साक्षात महाराजांची अनुभूती







**वरोरा । प्रतिनिधी**

श्री गजानन महाराजांचे जीवन म्हणजे एक दिव्य अध्यात्मिक झऱ्यासारखे आहे. त्यांची कृपा ज्या भक्तावर झाली, त्याचे जीवनच परावर्तित झाले. महाराजांचे जीवनात येणं ही योगायोगाची घटना नसून, ते भाग्याचे आणि पुण्याचे लक्षण आहे,अशा शब्दांत गजानन बावन्नीचे लेखक आणि हिंदू धर्माचे गाढे अभ्यासक प्रा. सुरेश शेवडे उर्फ आबा यांनी वरोरा येथे भरलेल्या 'गाथा अमृतकण' प्रवचन कार्यक्रमात श्री गजानन महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकला.नव्वद वर्षीय प्रा. शेवडे यांनी त्यांच्या वाणीतील तेज, शब्दातील धार, आणि अनुभवातून आलेल्या गूढ अध्यात्मिक अंतःप्रेरणेमुळे संपूर्ण सभागृहाला मंत्रमुग्ध केले. त्यांनी सांगितले, गजानन महाराजांनी आपल्या आचरणातून जीवन कसं जगावं, हे शिकवलं. त्यांनी तहानलेल्या भक्ताला पाणी दिलं, प्रसंगी मधमाशांचे डंख सहन केले, पण भक्तासाठी कधीही मागे हटले नाहीत. त्यांनी रज व तम यांपासून दूर राहून सत्वगुणांचे सिंचन केलं आणि भक्तांना सदाचारी जीवन जगण्याची दिशा दाखवली.


प्रवचनात शेवडे यांनी अमेरिकेतील जागतिक हिंदू परिषद मधील आपल्या अनुभवांची उजळणी करत सांगितले की, हिंदू धर्म हा ईश्वरनिर्मित आहे, त्यामुळेच त्याच्या ग्रंथांमध्ये सर्व मानवजातीसाठी मार्गदर्शन आहे. इतर पंथ हे मानवनिर्मित आहेत आणि त्यामुळे त्यांच्यात सीमितता आहे. वेद, उपनिषदे आणि पुराण हे विश्वातील सर्वश्रेष्ठ शास्त्र आहेत. ही केवळ धार्मिक श्रद्धा नाही, तर ती आत्मज्ञानाची पराकाष्ठा आहे.या कार्यक्रमात वरोरा नगरीतून श्री गजानन महाराजांच्या पवित्र पादुकांची मोठ्या भक्तिभावाने भव्य परिक्रमा काढण्यात आली. रांगोळ्यांनी सजवलेले रस्ते, फुलांनी आणि जयघोषांनी भारलेले वातावरण, आणि प्रत्येक टप्प्यावर पादुकांचे स्वागत हे दृश्य म्हणजे भक्तीचे मूर्त स्वरूप होते. अनेक ठिकाणी महिला, वृद्ध, तरुण आणि लहान मुले यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.कार्यक्रमात उल्हासनगर येथील बाळकृष्ण कुळसंगे यांनी लिहिलेल्या 'अमृतकण' या ग्रंथाचे प्रकाशन प्रा. शेवडे यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यांनी आपल्या दीर्घ साधनेतील अनेक अलौकिक अनुभव भावपूर्ण शब्दांत मांडले. या अनुभवांनी उपस्थित भाविकांच्या डोळ्यांत अश्रू आणले आणि महाराजांच्या कृपेची साक्ष दिली.प्रास्ताविक राजीव दोडके यांनी केले, तर संचालनाची सूत्रे उमेश लाभे यांनी समर्थपणे हाताळली. कार्यक्रमात अनेक सेवाभावी कार्यकर्त्यांनी श्रमदान, नियोजन आणि अंमलबजावणीत पुढाकार घेतला. त्यांचा यथोचित सत्कारही यावेळी करण्यात आला.पाया कार्यक्रमाला चंद्रपूर, नागपूर, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, मुंबई, पुणे अशा अनेक भागांतून भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. यामुळे कार्यक्रमाचे स्वरूप प्रादेशिक न राहता राज्यव्यापी झाले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. शेवडे यांचे दीर्घकाळ स्मरणात राहणारे 'गजानन महाराज हे भक्ताच्या मनातच नाही, तर कर्मातही असले पाहिजेत' हे वाक्य उपस्थित भक्तांना अंतर्मुख करून गेले.

# रक्तदान,वृक्षारोपण,आणि मुवी कास्टिंग च्या उपक्रमांतून पर्यावरण दिन साजरा

## यहोवा यिरे फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

यहोवा यिरे फाउंडेशन चंद्रपूरतर्फे ६ व ७ जून रोजी पर्यावरण दिनानिमित्त दोन दिवसीय उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. रक्तदान शिबीर, वृक्षारोपण आणि मुवी कास्टिंग ऑडिशन असे तीन विविध स्वरूपाचे उपक्रम एकत्रितपणे राबवून फाउंडेशनने पर्यावरण आणि आरोग्य या दोन्ही विषयांप्रती सामाजिक बांधिलकी जपली.कार्यक्रमाचे उद्घाटन कोमलकुमार सूर्यवंशी, पोलीस उपनिरीक्षक (वाहतूक विभाग, चंद्रपूर) यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संगीता खोब्रागडे (स्त्रीरोगतज्ज्ञ, सरकारी रुग्णालय, चंद्रपूर) या होत्या. याशिवाय प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. गुनिका पोटदुखे (रक्त संक्रमण अधिकारी), तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मनिष मोते, डॉ. रंजना गवारकर, डॉ. राकेश शेंडे (समाजसेवक), ज्येष्ठ पत्रकार डी.के. आरिकर, कॉंग्रेसचे प्रदेश सचिव विजय नळे, डॉ. रमेशकुमार बोरकुटे (उपाध्यक्ष - पर्यावरण संवर्धन व विकास समिती, महाराष्ट्र राज्य), सचिन पानघाटे (चेअरमन यहोवा यिरे अर्बन क्रेडिट को.ऑप. सोसायटी), तसेच फाउंडेशनच्या वाईस चेअरमन अपेक्षा जॉब यांची उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमात सरकारी रुग्णालय, चंद्रपूरच्या वैद्यकीय पथकाने मोलाचे सहकार्य केले. रामेश्वर बारसागडे (समूहदेशक), रत्नघोष मेश्राम (औषधी निर्माता), स्टाफ नर्स सोनू कातकर, आशा गेडाम, रंजना वाघाडे (परिचारिका), वृश्राली चिंताडे (प्रयोगशाळा तंत्रज्ञ), तसेच डॉ. आशिष , डॉ. फराज ,सोनू मरसकोल्हे, दुर्गादास गिर्है, विजय कोटावार (रक्तकक्ष सेवक), जयश्री कोरडे (प्रयोगशाळा), आणि अन्य कार्यकर्त्यांचे योगदान लाभले.शिका, कमवा व प्रगती करा या ब्रीदवाक्याशी एकरूप होत, यहोवा यिरे फाउंडेशनचे सीईओ डॉ. रमेशकुमार बोरकुटे यांनी संकल्पपूर्वक पर्यावरण जागरूकता आणि बॉडी इन्व्हेस्टमेंट उपक्रमांद्वारे दोन दिवसांचे हे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडले. आरोग्य तपासणी शिबिरात १६३ नागरिकांनी आपली मोफत तपासणी करून घेतली, तर १२३ नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक योगदान दिले. दुसऱ्या दिवशी वडगाव परिसरात विविध प्रकारची ५० झाडे लावून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. त्याच दिवशी मुवी कास्टिंग ऑडिशनसाठी चंद्रपूरसह परिसरातील विविध भागांतून आलेल्या ६० हून अधिक कलावंतांनी सहभाग नोंदवला.झाडे लावा, झाडे जगवा आता चालवा एकच चळवळ या पर्यावरण विषयक घोषवाक्याने या कार्यक्रमाची सांगता झाली. सामाजिक सहभाग, आरोग्य, कला व पर्यावरण या सर्व क्षेत्रांचा समन्वय साधत यहोवा यिरे फाउंडेशनचा हा उपक्रम एक यशस्वी आणि अनुकरणीय उदाहरण ठरला आहे.





# स्कूल बस तपासणीकडे आरटीओचे दुर्लक्ष विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर

## सातार्‍यात शाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर नियोजनाचा अभाव, पालकांमध्ये अस्वस्थता




### मागण्या आणि उपाययोजना

* प्रत्येक स्कूल बस व व्हॅनची प्रत्यक्ष तपासणी करूनच परवानगी द्यावी
* फिटनेस नसलेल्या विना-अनुज्ञापत्र वाहनांवर तत्काळ कारवाई करण्यात यावी
* पालक व शाळा प्रशासनाच्या सहभागातून वाहतूक नियमन समिती स्थापन करावी
* वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या रिक्षांचेही नोंदणी व तपासणी अनिवार्य करावी
* आरटीओ कार्यालयातील तक्रार निवारण यंत्रणा अधिक कार्यक्षम करावी

**सातारा । किरण अडागळे**

सातारा जिल्ह्यात शाळा सुरू होण्यासाठी केवळ काही दिवसांचा अवधी राहिला असतानाही शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या स्कूल बस व व्हॅन यांची तपासणी अद्यापही न झाल्याने प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आर.टी.ओ.) कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबतची जबाबदारी कुणाची? असा संतप्त सवाल पालकवर्ग आणि स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

मोटार वाहन कायद्यानुसार प्रत्येक वर्षी शाळा सुरू होण्यापूर्वी स्कूल बस, व्हॅन, रिक्षा यांची फिटनेस तपासणी व संबंधित चालकांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण आवश्यक असते. मात्र, यंदा १६ जूनपासून शाळा सुरू होत असूनही आरटीओच्या पातळीवर कुठल्याही ठोस तपासणी मोहीमेचा आरंभ झालेला नाही. त्यामुळे अवैध आणि अपुऱ्या सोयीसुविधा असलेल्या वाहनांतून विद्यार्थ्यांची वाहतूक होण्याची शक्यता वाढली आहे.

### पालकांची भावना

आपली मुलं दररोज या बसेस आणि व्हॅन्समधून शाळेत जातात. आरटीओच्या हलगर्जीपणामुळे जर काही अनर्थ घडला तर जबाबदार कोण? असा सवाल करत पालक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी संबंधित मंत्र्यांनी या प्रकारात लक्ष घालून अधिकाऱ्यांचे कान टोचावेत, अशी मागणी केली आहे.आता प्रश्न असा की, शाळा सुरू होण्याआधी योग्य ती दक्षता घेतली जाईल का, की एखाद्या दुर्घटनेची वाट पाहूनच प्रशासन खडबडून जागं होईल?

### प्रशासन शांत, नागरिक संतप्त

आरटीओ कार्यालयात शिस्त व नियोजनाचा अभाव असून हम करे सो कायदा अशी कार्यपद्धती सुरू आहे. स्थानिक पदाधिकारी व नागरिक जेव्हा वरिष्ठ अधिकाऱ्यांना संपर्क साधतात तेव्हा त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते, अशी तक्रार वारंवार ऐकू येते. यामुळे शासन व प्रशासनाविषयी नाराजीचा सूर वाढतो आहे. चार मंत्र्यांचा जिल्हा असूनही आरटीओ विभागात अनुशासन का नाही? असा सवाल सामान्य नागरिक विचारत आहेत.

### कागदावरच तपासणी?

यापूर्वी अनेकदा असा अनुभव आला आहे की, केवळ कागदोपत्री तपासणी दाखवून बस व व्हॅन यांना परवानगी दिली जाते. प्रत्यक्षात मात्र वाहनांमध्ये जास्तीच्या विद्यार्थ्यांची कोंबकोंब, बसमध्ये फायर एक्झिट, फर्स्ट एड किट, जीपीएस अशा अत्यावश्यक सुरक्षाविषयक बाबींचा अभाव दिसतो.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .